बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध

प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5

टेलि - 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 495

# प्रसिद्धीसाठी

## बँक ऑफ महाराष्ट्रने आपला ८६ वा व्यवसाय प्रारंभ दिन साजरा केला

**पुणे दिनांक ९ फेब्रुवारी २०२१** : बँक ऑफ महाराष्ट्रचा ८६ व्यवसाय प्रारंभ दिन मुख्य कार्यालयासह सर्व विभागीय कार्यालये व शाखांमध्ये दिनांक ८ फेब्रुवारी २०२१ रोजी साजरा करण्यात आला. बँक ऑफ महाराष्ट्रचे मुख्यालय असलेल्या लोकमंगल लॉन्स येथे मुख्य कार्यक्रम साजरा करण्यात आला. बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव, कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा , भारतीय रिझर्व बँकेचे नामनिर्देशित संचालक श्री एम के वर्मा, व मुख्य कार्यालयातील अन्य सर्व सरव्यवस्थापक व कर्मचारी वर्ग सदर कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमात कोव्हीड १९ संबंधित सर्व नियम व सामाजिक अंतर यांचे पालन करण्यात आले.

आपल्या ८६ व्या व्यवसाय प्रारंभ दिनी, बँकेने तंत्रज्ञानावर आधारित अनेक सेवा सुरु केल्या आहेत. त्यामध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी डिजिटल कर्ज वितरण सेवा, अंतर्गत कर्ज जोखीम मूल्यांकनासाठी एकीकृत जोखीम व्यवस्थापन संकेतस्थळ ( पोर्टल ) “ आयकॉन “ ,चॅनेल वित्त साहाय्य सेवा, ऑनलाईन खाते उघडण्यासाठी सेवा, ग्राहक सेवा केंद्रे, शहरी व्यवसाय प्रतिनिधी, ग्राहकांच्या ऑनलाईन प्रतिसादाचा अभ्यास, छोट्या ग्राहकांच्या गट विमा योजनांना वित्त साहाय्य करण्यासाठी मुदती कर्जाची योजना, त्वरित लॉकर सुविधा इत्यादी सेवांचा समावेश आहे.

या प्रसंगी बोलताना श्री ए एस राजीव म्हणाले " संपूर्ण अर्थव्यवस्था अलीकडील इतिहासातील सर्वात कठीण काळातून जात असताना आणि बँकिंग उद्योगाची वाढ ५ % - ६ % असताना बँक ऑफ महाराष्ट्रचा व्यवसाय १० - १२ % दराने वाढावा, हे निश्चितच कौतुकास्पद आहे. सद्य स्थितीत बाजारपेठेत सुद्धा अतिशय सकारात्मक वातावरण असून आपल्या मालमत्तेची उत्तम गुणवत्ता राखत सर्व महत्वाच्या निकषांमध्ये बँकेने आपल्या कामगिरीत अतिशय उत्तम सुधारणा केली आहे. आपल्या बँकेच्या डिजिटल योजनांमुळे आपल्या सर्वसमावेशक वाढीला एक नवा आयाम मिळाला असून येणाऱ्या तिमाहीमध्ये एक मध्यम आकाराची मजबूत व भक्कम बँक म्हणून पुढे येण्यास आपण सज्ज आहोत. ”.

बँकेला सातत्याने वाढीच्या व नफ्याच्या मार्गावर मार्गक्रमण करत राहून तिच्या विकासासाठी अथक प्रयत्न करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे बँकेचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा यांनी कौतुक केले. गुणवत्तेवर आधारित कर्ज वितरण, चालू व बचत ( कासा ) ठेवी / खात्यांचे प्रमाण ५२ % पर्यंत वाढवणे, वसुली प्रक्रिया बळकट करणे , अधिक खाती एनपीए न होऊ देणे , बिगर व्याज उत्पन्न

वाढविणे व ग्राहक सेवेत सातत्याने सुधारणा अशा पंचासुत्रीचा कामात अवलंब करण्यावर त्यांनी भर दिला व त्याद्वारेच बँकेची पुढील प्रगती वेगात होऊ शकेल असे सांगितले.

बँकेच्या संस्थापकांच्या छायाचित्रांना हार घालून व पारंपारिक दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. बँकेच्या कर्मचाऱ्यांनी गायन, नृत्य, नकला, लोककला, एकपात्री प्रयोग, इत्यादी कलांचे सादरीकरण करून आपले कौशल्य प्रकट केले.